# मिरा-भाईंदर,वसई- विरार आयुक्तालय

विषय :- दिनांक- १६/०२/२०२३ रोजीचे पेपर कात्रणाबाबत.

१) गुन्हेगारी घटना  २) कायदा व सुव्यवस्था ३) राजकीय घटना ४) इतर

| अ. क्र. | दिनांक | वर्तमान पत्राचे नांव | बातमीचा मथळा (Heading) | संबंधीत पो.ठाणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | १६.०२.२०२३ | म.टा. पान क्र. ३ | लिव्ह इन मधील तरुणीची हत्या | तुळींज | |
| २. | १६.०२.२०२३ | पुढारी पान क्र. ५ | घरे स्वस्त दरात देण्याच्या बहाण्याने करोडोंचा चुना | अर्नाळा / गुन्हे शाखा कक्ष ३ | |
| ३. | १६.०२.२०२३ | पुढारी पु. पान क्र. १ | दुचाकी चोरी करणारी टोळी गजाआड | गुन्हे शाखा कक्ष २ | |
| ४. | १६.०२.२०२३ | लोकमत पान क्र. ३ | टिकटॉकवर भेटलेल्या भावी नवऱ्याचाच डल्ला | भाईंदर | |
| ५. | १६.०२.२०२३ | पुण्यनगरी पु. पान क्र. १ | नालासोपाऱ्यात मायलेकींनी दिला रोडरोमियोला चोप | आचोळा | |
| ६. | १६.०२.२०२३ | सकाळ पु. पान क्र. १ | महाशिवरात्र उत्सवासाठी तुंगारेश्वर मंदीर प्रशासन सज्ज | पेल्हार | |
| ७. | १६.०२.२०२३ | सामना पान क्र. ५ | बोगस डॉक्टरचा महिलेला आठ लाखांचा चुना | नवघर | |
| ८. | १६.०२.२०२३ | पुढारी पान क्र. ३ | २ नायजेरीयन नागरीक ताब्यात | तुळींज | |
| ९. | १६.०२.२०२३ | लोकमत पान क्र. ३ | व्हॅलेंटाईन डेच्या दिवशीच अल्पवयीन मुलीवर बलात्कार | वालीव | |
| १०. | १६.०२.२०२३ | लोकसत्ता पु. पान क्र. १ | वसईत वर्षभरात १८ हजार रिक्षाचालकांवर कारवाई | वसई विरार | |
| ११. | १६.०२.२०२३ | लोकमत पु. पान क्र. १ | व्हाटसअप डीपीवर फोटो ठेवुन २० हजारांचा गंडा | नवघर | |
| १२. | १६.०२.२०२३ | लोकमत पान क्र. ३ | भाजप कार्यालयात तोडफोड प्रकरणी गुन्हा दाखल | विरार | |

CS CamScanner

१) म.टा. पान क्र. ३

दि. १६/०२/२०२३

# ‘लिव्ह इन’मधील तरुणीची हत्या

## नोकरी करण्याचा तगादा लावल्याने हत्या केल्याची कबुली

**म. टा. वृत्तसेवा, वसई**

एका तरुणासोबत लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या तरुणीची तिच्या जोडीदाराने हत्या केल्याची खळबळजनक घटना नालासोपारा येथे घडली आहे. नोकरी करून घरात पैसे आण असा तगादा तिने लावल्याने आरोपीने ही हत्या केल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. या प्रकरणी तुळींज पोलिसांनी या तरुणास अटक केली असून त्याने या गुन्ह्याची कबुली दिली आहे. या मृत तरुणीचे नाव मेघा तोरबी (३६) असून हार्दिक शहा (२६) असे या आरोपीचे नाव आहे.

मिरा रोड येथे राहणारा हार्दिक व नालासोपारा येथे राहणाऱ्या या तरुणीचे तीन वर्षांपासून प्रेमसंबंध होते. तसेच सहा महिन्यांपासून ते लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये होते. २० दिवसांपूर्वी तुळींज येथील सीता सदन या इमारतीत ते भाड्याच्या घरात राहण्यास आले होते. हार्दिक हा सुशिक्षित बेकार होता,



तर मेघ ही परिचारिका होती. तिच्या कमाईवरच घरखर्च चालत असे. हार्दिक हा कामधंदा करीत नसल्याने या दोघांत नेहमी वादविवाद होत असत. मात्र हार्दिकने सोमवारी मेघाच्या मावशीला मेघाचा मृत्यू झाल्याचे कळविले. तसेच, मीही आत्महत्या करणार असल्याचे सांगितले. त्यामुळे मेघाच्या मावशीने पोलिसांना याविषयी त्वरित माहिती दिली. तुळींज पोलिसांनी या दोघांचे घर गाठले. त्यावेळी मेघाचा मृतदेह कॉटच्या आत सडलेल्या स्थितीत पोलिसांना आढळला. मात्र हार्दिक फरार होता. शवविच्छेदन अहवालात मेघाची गळा आवळून हत्या झाल्याचे उघड झाले.

### ४० लाखांचे सामान चोरले

पोलिसांनी हार्दिकचा शोध सुरू केला असता त्याच्या मोबाइल फोनद्वारे त्याचे शेवटचे ठिकाण पोलिसांना कळले. सीसीटीव्हीच्या फूटेजच्या मदतीने गुजरात-राजस्थानच्या सीमेवरील नागदा रेल्वे स्थानकातून त्याला मंगळवारी ताब्यात घेण्यात आले. चौकशीअंती त्यानेच ही हत्या केल्याचे उघड झाले. मेघा ही गेल्या एक महिन्यापासून नोकरीस जात नव्हती. त्यामुळे तिने हार्दिककडे नोकरी करण्याचा तगादा लावला होता. त्याला कंटाळून मी तिची हत्या केल्याचे त्याने पोलिसांना सांगितले. हार्दिक हा एका चांगल्या कुटुंबातील मुलगा असून त्याच्या वडिलांचा हिऱ्याचा व्यापार आहे. मात्र तीन वर्षांआधी त्याने घरातील ४० लाखांचे सामान चोरून ते विकले होते. याबाबत वडिलांनी पोलिस ठाण्यात तक्रार केली नव्हती मात्र त्याच्याशी संबंध तोडले होते, अशी माहिती तुळींज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांनी दिली.

२) पुढारी पान क्र. 5

# घरे स्वस्त दरात देण्याच्या बहाण्याने करोडोंचा चुना

## बंटी बबलीच्या टोळीला अटक; आता पर्यंत १५७ लोकांची ३.७५ कोटींची फसवणूक

**नालासोपारा : पुढारी वृत्तसेवात**

बँकांनी सिल केलेली घरे स्वस्त दरात देण्याच्या बहाण्याने करोडोंचा चुना लावणाऱ्या बंटी बबलीच्या टोळीला गुन्हे शाखेच्या प्रमोद बडाखांनी तडाखा दिला असून मुंबई, ठाणे आणि वसई-विरार मध्ये घरांचे स्वप्न पाहणाऱ्या सर्वसामान्यांना करोडोंचा चुना लावणाऱ्या बंटी बबलीच्या टोळीला विविध ठिकाणाहून अटक केली आहे. विशेष म्हणजे २ जणांनी वकिलीच शिक्षण पूर्ण केल असून एक जण मुंबईच्या कोर्टात वकिली करीत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. परवेज आणि हिनाची जोडी अर्थात बंटी बबली या जोडगोळीने वसई विरार,, ठाणे, मुंबई परिसरात राहणाऱ्या स्वस्त घराचे स्वप्न पाहणाऱ्या लोकांना बँकेने सील केलेले रूम स्वस्त दारात विक्री करतो असे सांगून आता पर्यंत १५७ लोकांची ३.७५ कोटींची फसवणूक केल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे.

### तपासात धक्कादायक माहिती उघड

या चारही आरोपींनी तिन्ही वेळी आपली नावे बदलण्यात आली होती. परवेज दस्तगीर शेख हा मिरारोड चा राहणारा आहे त्याने राहुल भट, पिटर सिकवेरा, आसिफ सैय्यद, अशी नावे धारण केली होती. साहेब हुस्सेन शेख हा भाईंदरचा आहे. पेशाने वकील असून नितीन शर्मा, प्रशांत बन्सल, सोहल शेख अशी नावे धारण केली होती. प्रविण मल्हारी ननावरे हा खारेगाव, कळवा येथील असून त्याच्या कागदपत्रांचा वापर करून हि फसवणूक करण्यात आली. हिना इकबाल चुडेसरा हि काशिमिरा येथील असून तिने अलायदा शहा, हिना सैय्यद अशी नावे धारण केली होती.

परवेश शेखने वकिलीचे शिक्षण पूर्ण केले आहे. तो काही दिवस बँकिंग हौसिंग क्षेत्रात काम करीत होता. त्यामुळे त्याने बँकांचे लिलावात काढण्यांत येणारी घरे याची माहिती कशी घ्यायची याची पूर्ण कल्पना आली होती. त्या दरम्यान परवेज आणि हीना यांची ओळख झाली आणि ओळखीचे रुपांतर प्रेमात झाले. साहेब शेख हा वकील असून तो मुंबईच्या कोर्टात वकिली करतो त्यांनी एकत्र मिळून लोकांना बँकांनी सील केलेली घरे स्वस्तात देण्याचा बहाणा करून लोकांना लुटण्याचा प्लान आखून त्यांनी ठाण्यात लॅन्ड लेंडर नावे कंपनी स्थापन करुन जी.बी. रोड कापुरबावडी, जि. ठाणे येथील सुमारे ४० नागरीकांची १.२० कोटींची फसवणूक केली पाटील डिजीटल नावे कंपनी स्थापन करुन आझाद मैदान, मुंबई येथील सुमारे ७२ नागरीकांची १.७५ विरार मध्ये बिडर्स विनर्स कंपनी स्थापन करून ८० लाखांची फसवणूक केली.

CS CamScanner

दि. 16/02/2023

3) पुढारी पृ. पान क्र. 1

# दुचाकी चोरी करणारी टोळी गजाआड

## १२ दुचाकी जप्त, १३ गुन्ह्यांची उकल




**खानिवडे : पुढारी वृत्तसेवा**

वसई- विरार परिसरातील दुचाकी चोरी करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीला पकडून १२ दुचाकी जप्त करीत १३ गुन्ह्यांची उकल करण्यात गुन्हे शाखा, वसई युनिटला यश आले आहे,

मोटारसायकल चोरी झालेल्या ठिकाणांना प्रत्यक्ष भेट देवून घटनास्थळावरील सी.सी.टी.व्ही. फुटेजचे परीक्षण करण्यात आले. तांत्रिक विश्लेषण करून गोपनीय माहितीच्या आधारे तुळींज पोलीस ठाणे हद्दीतील मोरेगाव परीसरामधून आनंद कलमेश औझा व एक विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेवून त्यांचेकडे चौकशी केली असता विरार, वालीव, आचोळे, माणिकपुर, काशिमिरा, दहीसर पोलीस ठाणे हद्दीतुन १२ मोटार सायकली चोरी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यांच्याकडे अधिक सखोल विचारपूस करता त्यांनी त्या मोटारसायकली सोनगढ, गुजरात याठिकाणी विक्री करीत असल्याबाबतची माहीती दिली. त्यांना गुन्ह्यात आरोपी धिरज जटाशंकर ओझा व कौशिक देविदास मराठे, रा. सोनगड, जि. तापी, राज्य गुजरात हे मदत करीत असल्याचे सांगितले. त्यांना सोनगढ, राज्य गुजरात येथून ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपीतांकडून एकुण ७,५५,०००/- रुपये किंमतीच्या १२ मोटारसायकली जप्त करण्यात आल्या आहेत.

4) लोकमत पान क्र. 3

# टिकटॉकवर भेटलेल्या भावी नवऱ्याचाच डल्ला

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**मीरारोड :** टिकटॉकवर भेटलेल्या भावी नवऱ्यानेच भावी पत्नीच्या घरावर डल्ला मारल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी संबंधित व्यक्तीविरोधात भाईंदर पोलिसांनी गुन्हा दाखल आहे.

भाईंदर पश्चिमेस पोलिस ठाणे परिसरातील २० वर्षीय तरुणीची ओळख पुण्याच्या जांबे मार्गावर राहणाऱ्या गोपाळ राधाकिसन उदावंत (वय ३०) याच्याशी टीकटॉकवर झाली होती. २०१९ मध्ये झालेल्या या ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि दोघांचा ऑगस्ट २०२१ मध्ये साखरपुडा झाला. त्यानंतर गोपाळ हा भाईंदर येथे त्या तरुणीच्या घरीच राहायला आला. तो तरुणीची आई, बहीण-भाऊ यांच्यासह राहून भाईंदर फाटक येथे नोकरीला जात होता. ११ फेब्रुवारीला तब्येत बरी नाही सांगून गोपाळ घरीच थांबला होता. रात्री तरुणी, तिची आई आणि बहीण कामावरून घरी आले असता गोपाळ हा शेजारी चावी देऊन गेला होता. तरुणीने रात्री जेवणासाठी गोपाळला कॉल केला असता तो बंद होता. आईला संशय आल्याने त्यांनी घरातील दागिने पाहिले असता मंगळसूत्र, कानातले व मुहूर्तमणी असे सोन्याचे दागिने चोरीला गेले होते. दोन दिवस वाट पाहूनही तो न परतल्याने तरुणीच्या फिर्यादीवरून १४ फेब्रुवारीला भाईंदर पोलिसांनी २७ हजारांच्या दागिने चोरीप्रकरणी गोपाळवर गुन्हा दाखल केला आहे.

5) पुण्यनगरी पृ. पान क्र. 1

# नालासोपाऱ्यात मायलेकीने दिला रोडरोमियोला चोप

**। नालासोपारा ।** प्रेम व्यक्त करण्याच्या आदल्या दिवशी तरुणीने आणि तिच्या आईने रोडरोमियोला चोप दिल्याची घटना नालासोपाऱ्यातील आचोळे रोड येथे घडली. याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. व्हॅलेंटाईन डे साजरा केला जात असताना त्याच्या पूर्वसंध्येला पोरींची येता-जाता छेडछाड काढणाऱ्या रोडछाप रोमियोंची काही कमी नाही. काही मुली हा त्रास सहन करतात, पण काही मुली सहन न करता त्या रोडरोमियोला कायमची अद्दल घडवतात. व्हॅलेंटाईन डेला काहीतरी तुफानी करते हैं..च्या आवेशात गेलेल्या अशाच एका रोडरोमियोला चांगलेच महागात



पडले. नालासोपाऱ्यात मुलीची छेड काढणाऱ्या एका तरुणाला भररस्त्यात बेदम चोप देण्यात आला. त्याचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. दरम्यान, तुळींज पोलीस ठाण्यात या प्रकरणाची कोणतीही नोंद झाली नाही. तसेच पीडित मुलगी आणि तरुण यांच्या बाबत कोणतीही माहिती मिळाली नाही. या परिसरात मुलींची रोजच छेड काढली जाते. अशा प्रकारची टवाळकी करणाऱ्या तरुणांनी या परिसरात उच्छाद मांडला आहे, अशी तक्रार या परिसरातील नागरिकांनी केली आहे. त्यामुळे मुलींची छेड काढण्याच्या घटनेत दिवसेंदिवस वाढ होत असल्याने पोलिसांनी अशा रोडरोमियोंना कायमची अद्दल घडवावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

CamScanner

दि. 16/02/2023


6) सकाळ पु. पान क्र. 1

# महाशिवरात्र उत्सवासाठी तुंगारेश्वर मंदिर प्रशासन सज्ज

## परिवहन सेवेच्या एक हजाराहून अधिक बस फेऱ्या

वसई, ता. १५ (बातमीदार) : वसई पूर्वेकडील सातिवली येथे तुंगारेश्वर याठिकाणी महादेवाचे पुरातन मंदिर आहे. महाशिवरात्रीनिमित्त याठिकाणी लाखोंच्या संख्येने भाविक येत असतात. त्यामुळे शनिवारी महाशिवरात्रीनिमित्त मंदिर प्रशासनासह वसई- विरार महापालिकेच्या परिवहन विभाग, आरोग्य पथक, घनकचरा व्यवस्थापन विभागासह पोलिस सज्ज झाले आहेत. तुंगारेश्वरला दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या सेवेसाठी महापालिका परिवहन सेवेच्या एक हजार १०० बसेसच्या फेऱ्या धावणार आहेत, अशी माहिती परिवहन समितीचे सभापती भरत गुप्ता यांनी दिली.

वसई तालुक्यातील सातिवली येथील तुंगारेश्वर पर्वतावर महादेवाचे मंदिर दोन हजार १७७ फुटांवर आहे. लक्ष्मणाचे प्राण वाचविण्यासाठी हनुमान द्रोणागिरी पर्वत नेत असताना काही भाग तुंगार पर्वतावर पडला. हाच मंदाग्नी म्हणजे तुंगार पर्वत अशी आख्यायिका आहे. महाशिवरात्रीनिमित्त पालघरसह मुंबई, ठाणे जिल्ह्यांतून मोठ्या प्रमाणात भाविक येथे दर्शनासाठी येत असतात. त्यामुळे तुंगारेश्वर मंदिर देवस्थान ट्रस्टकडून भाविकांच्या सुरक्षेची काळजी घेतली जाणार आहे. त्याचबरोबर वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून पोलिस तैनात असणार आहेत. यामुळे भाविकांना तुंगारेश्वर महादेव मंदिरात जाताना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागणार नाही. याचबरोबर घनकचरा व्यवस्थापन विभाग स्वच्छता राखण्यासाठी कर्मचारी तैनात करणार आहे. याशिवाय एकूण १०० पोलिसांचा ताफा यावेळी तैनात असणार आहे.



### अशी असेल सुविधा

१ वसई, नवघर, नालासोपारा, विरार व शिरसाड फाटा या चार ठिकाणी परिवहन सेवेच्या बसेस भाविकांना सेवा देणार आहे. यात १७ फेब्रुवारीला दुपारपासून ते १८ फेब्रुवारी मध्यरात्रीपर्यंत बस सेवा उपलब्ध राहणार आहेत. यात नवघर येथून दर ३ मिनिटांनी, नालासोपारा ५ मिनिटांनी, विरार १५ व शिरसाड फाटा येथून दर २० मिनिटांनी बसेस धावणार आहेत.

२ विशेष म्हणजे वसई-विरार शहर महापालिकेच्या आरोग्य विभागाने चोख व्यवस्था ठेवली आहे. नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी सातिवली तुंगारेश्वर येथील बापा सीताराम मार्गावर व महादेव मंदिर येथे आरोग्य पथक उपलब्ध असणार आहे.

३ वसईतील वर्तक महाविद्यालयाचे एनएसएसचे विद्यार्थीदेखील भाविकांच्या सेवेसाठी हजर असणार आहेत. याचबरोबर महामार्गावर दोन्ही दिशेला मंडप उभारले जाणार असून या ठिकाणाहून भाविकांना मार्गदर्शन केले जाणार आहे.

7) सामना पान क्र. 5

# बोगस डॉक्टरचा महिलेला आठ लाखांचा चुना

भाईंदर, दि. १५ (सा.वा.) - फेसबुकवर झालेल्या मैत्रीचा गैरफायदा घेऊन बोगस डॉक्टरने एका महिलेला तब्बल आठ लाखांचा चुना लावल्याचा प्रकार भाईंदरमध्ये समोर आला आहे. याबाबत नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रेयॉन रोलंड असे या आरोपीचे नाव आहे. त्यामुळे फेसबुकवरची मैत्री चांगलीच महागात पडली आहे.

भाईंदर पूर्वेतील सोनम सुविधा बिल्डिंगमध्ये अलका पाटील या राहात असून त्यांची गेल्या वर्षी फेसबुकवर रेयॉन रोलंड यांच्याशी ओळख झाली होती. रेयॉनने त्यांना सुरुवातीला फेसबुक अकाऊंटवर फ्रेंड रिक्वेस्ट पाठवली होती. यावेळी त्याने आपण डॉक्टर असल्याची बतावणीदेखील पाटील यांना केली होती. त्यानंतर काही दिवसांनी तुमच्या अकाऊंटवर ८० हजार पाऊंड पाठवल्याचे सांगून प्रोसेसिंग फीच्या नावाखाली वेळोवेळी लाखो पैसे उकळले. याबाबत नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

8) पुढारी पान क्र. 3

# २ नायजेरियन नागरिक ताब्यात

मिरारोड : पुढारी वृत्तसेवा

तुळींज पोलीस ठाणे हद्दीत व्हिसाची मुदत संपल्यानंतरही दोन नायजेरियन नागरिक वास्तव करत होते.त्या नायजेरियन नागरिकांना विशेष शाखेने ताब्यात घेऊन हद्दपार करण्यात आले आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय हद्दीत मुदत बाह्य वास्तव्य करणाऱ्या परकीय नागरीकांना हद्दपार करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली. परकीय नागरिक जुडे चिकवडो इझिम हा २९/०२/२०१४ पासून व ख्रिस्तोफर जिम चिकउमा हा १७/०३/२००९ पासुन तुळींज पोलीस ठाणे हददीत बिजनेस व्हिसावर मुदतबाह्य वास्तव्य करीत असल्याचे आढळून आले. त्यांना छत्रपती शिवाजी महाराज आंतराष्ट्रीय विमानतळ येथे नेवून स. पो. हवा मंजुशा राजन गुप्ता यांनी काळ्या यादीत टाकून हद्दपार केले आहे.

9) लोकमत पान क्र. 3

# व्हॅलेंटाइन डेच्या दिवशीच अल्पवयीन मुलीवर बलात्कार

नालासोपारा : व्हॅलेंटाइन डेच्या दिवशीच म्हणजेच १४ फेब्रुवारी रोजी एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याची धक्कादायक घटना वसईत घडली आहे. नायगाव येथील बारावर्षीय शाळकरी मुलीला १९ वर्षीय मुलाने फूस लावून घरी नेले आणि तिच्यावर बलात्कार केल्याचे उघड झाले. याप्रकरणी संबंधित मुलाविरोधात वालीव पोलिस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपीने मंगळवारी ती शाळेत जाण्यासाठी निघाली असताना रस्त्यात गाठून आज प्रेमाचा दिवस असल्याचे



सांगत फूस लावून घरी नेले आणि बलात्कार करत घरात कोंडून ठेवले. त्यानंतर शाळा सुटण्याच्या वेळेस तिची सुटका केली. पीडित मुलीने तडक घर गाठले आणि आईला या घटनेबाबत सांगितले. मुलीच्या आईने तातडीने वालीव पोलिस ठाणे गाठले.

CamScanner

दि. 16/02/2023

10) लोकसत्ता पृ. पान क्र. 1

# वसईत वर्षभरात १८ हजार रिक्षाचालकांवर कारवाई

## वाहतूक विभाग कारवाई अधिक तीव्र करणार

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई :** वसई, विरार शहरात नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षाचालकांच्या विरोधात वाहतूक विभागाने कारवाईची मोहीम आखली आहे. वर्षभरात जवळपास १८ हजार ९०४ रिक्षांवर वाहतूक पोलिसांनी कारवाई केली आहे.

२०१७ पासून परवाने खुले झाल्याने मोठ्या संख्येने रिक्षा रस्त्यावर धावू लागल्या आहेत. मात्र तरीही शहरात अनधिकृतपणे व नियमबाह्य पद्धतीने रिक्षा चालविल्या जात आहेत. तर दुसरीकडे काही रिक्षाचालक हे वाहतूक नियमांचे पालन न करताच रिक्षा चालवीत आहेत. यामध्ये विनापरवाना, विनाबॅच, अतिरिक्त प्रवाशांची वाहतूक, अतिरिक्त भाडे आकारणी, प्रवाशांसोबत गैरवर्तन, कालबाह्य झालेल्या रिक्षा चालविणे असे प्रकार सर्रासपणे घडतात. वर्षभरात वसई १८ हजार ९०४ रिक्षांवर नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी कारवाया करण्यात आल्या आहेत. त्यांच्याकडून ६३ लाख ३६ हजार ८०० रुपये दंड आकारण्यात आला असल्याची माहिती वाहतूक विभागाने दिली आहे. नियमानुसार केवळ तीन प्रवासी बसविण्यास परवानगी आहे. मात्र शहरातील विविध ठिकाणी तीनपेक्षा अधिक प्रवासी बसवून वाहतूक केली जाते. क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी रिक्षात बसविले जात असल्याने अपघाताचा धोका आहे. अशा रिक्षाचालकांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.

### कारवाई अधिक तीव्र करू

नियमांचे पालन करण्याच्या संदर्भात रिक्षाचालक व त्यांच्या संघटनांना वारंवार सूचना केल्या आहेत. मात्र तरीही शहरात काही रिक्षाचालक हे नियम पाळत नाहीत. याबाबत नागरिक ही तक्रारी करतात. अशा रिक्षांवर आता कारवाई व त्यांच्या तपासणीची मोहीम अधिक तीव्र केली जाणार आहे असे वाहतूक पोलीस निरीक्षक सागर इंगोले यांनी सांगितले आहे.

11) लोकमत पृ. पान क्र. 1

# व्हॉट्सअ‍ॅप डीपीवर फोटो ठेवून २० हजारांचा गंडा

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**मीरा रोड :** ओळखीच्या व्यक्तीचा व्हॉट्सअ‍ॅप डीपीवर फोटो लावून २० हजार रुपये उकळणाऱ्या अनोळखी व्यक्तीविरोधात भाईंदरच्या नवघर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

भाईंदरच्या आरएनपी पार्कमधील देवकीनंदन मोदी यांनी अंधेरीच्या भरत बिष्णोई यांना डायरी बनविण्याचे काम दिले होते. मोदी यांना व्हॉट्सअ‍ॅप डीपीवर भरतचा फोटो असलेल्या क्रमांकावरून आपण अडचणीत असून, २० हजारांची गरज आहे. सायंकाळी परत देतो, असा संदेश आला. मोदी यांनी बँक खाते क्रमांक मागितला असता समोरच्या व्यक्तीने व्हॉट्सअ‍ॅपवरच बँक खात्याचा क्रमांक व आयएफसी कोड पाठवला. मोदी यांच्या खात्यात तेवढी रक्कम नसल्याने त्यांनी त्यांचा भाचा हेमंत अग्रवाल ह्याला पैसे पाठविण्यास सांगितले. हेमंत यांनी मामाने दिलेल्या खाते क्रमांकावर २० हजार रुपये पाठवले. त्यानंतर पुन्हा त्या व्हॉट्सअ‍ॅपवरून मोदी यांना पत्नी आजारी असल्याने आणखी २० हजार रुपये हवे असल्याचा मेसेज आला. मोदी यांनी त्यांच्याकडे असलेल्या भरतच्या क्रमांकावर कॉल केला असता भरत यांनी आपला मोबाइल हॅक झाला असून, पैसे पाठवू नका, असे सांगितले. भरत यांचा फोटो डीपीवर ठेवून व्हॉट्सअ‍ॅपद्वारे आपली फसवणूक केल्याचे लक्षात आल्यावर मोदी यांनी नवघर पोलिस ठाण्यात फिर्याद नोंद केली. त्यानुसार पोलिसांनी १३ फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल केला आहे.

12) लोकमत पान क्र. 3

# भाजप कार्यालयात तोडफोड प्रकरणी गुन्हा दाखल

**नालासोपारा :** भारतीय जनता पक्षाच्या विरार येथील कार्यालयात तोडफोड केल्याप्रकरणी आरोपीविरोधात विरार पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मनवेल पाडा येथे मयूरेश्वर अपार्टमेंटमध्ये भाजप पक्षाचे कार्यालय आहे. या कार्यालयात मंगळवारी संध्याकाळी सातच्या सुमारास येऊन नकुल झुरी यांनी शिवीगाळ केली व कार्यालयातील सामानाची तोडफोड केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

CamScanner